**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दि.१२/०८२०२६

## परिवहन विभाग

### *संप मागे; वसई विरार शहर परिवहन सेवा पुन्हा नियमित*

वसई विरार शहर परिवहन सेवेमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत निर्माण झालेला संप आज दि.१२ ऑगस्ट रोजी महानगरपालिका मुख्यालयात झालेल्या बैठकीनंतर संपुष्टात आला असून, परिवहन सेवा आता नियमितपणे सुरू करण्यात येत आहे.

मा.महापौर महोदयांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या बैठकीत परिवहन कर्मचारी व ठेकेदार यांच्यामध्ये प्रलंबित असलेल्या मागण्यांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. कर्मचाऱ्यांनी केलेल्या एकूण १३ मागण्या ठेकेदारामार्फत मान्य करण्यात आल्या आहेत. यामध्ये कर्मचाऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या Overtime (अतिरिक्त कामाचा मोबदला) तसेच वेतनवाढीच्या मागणीचाही समावेश आहे.

बैठकीत झालेल्या सकारात्मक चर्चेनंतर कर्मचाऱ्यांनी संप मागे घेण्यास सहमती दर्शविली असून, वसई विरार शहर परिवहन सेवेच्या बसेस आजपासून नियमितपणे रस्त्यावर धावणार आहेत. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून प्रवाशांना निर्माण झालेली गैरसोय दूर होण्यास मदत होणार आहे.

या बैठकीस मा.महापौर श्री.अजीव पाटील, मा.उप-महापौर श्री.मार्शल लोपीस, मा.आरोग्य समिती सभापती श्री.निलेश देशमुख, मा.नगरसेवक श्री.प्रशांत राऊत, श्री.रोहन सावंत, श्री.सचिन देसाई, मा.परिवहन व्यवस्थापक श्री.धैर्यशील जाधव, मा. अतिरिक्त आयुक्त श्री.दिपक सावंत उपस्थित होते. संबंधित ठेकेदाराचे प्रतिनिधी तसेच कर्मचारी प्रतिनिधी यांच्यासोबत मागण्यांवर सकारात्मक आणि समन्वयाने चर्चा करण्यात आली.

वसई विरार शहरातील नागरिकांना सुरक्षित, नियमित आणि विश्वासार्ह सार्वजनिक परिवहन सेवा उपलब्ध करून देणे ही महानगरपालिकेची प्राथमिकता असून, प्रवाशांची गैरसोय होऊ नये यासाठी परिवहन सेवा सुरळीत व नियमित ठेवण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका परिवहन सेवा